


सर्वमंगल माङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ॥

संस्थापक डी. एन. शिर्के यांचे सर्वाधिक लोकप्रिय प्रकाशन ॥ श्री गुरुदेव दत्तात्रेय प्रसन्न ॥ पुणे व सातारा आवृत्ती

शास्त्रशुध्द संपूर्ण वार्षिक पंचांग

# श्री महालक्ष्मी ®

सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि.,कोल्हापूर Mahalaxmi.com.co

## १२ डिसेंबर २०२४

कार्तिक–मार्गशीर्ष–पौष
श्री शालिवाहन शके १९४६

विक्रम संवत् २०८१
शिवशक ३५१

सौर हेमंत–शिशिर ऋतू
दि.२१ सौर शिशिर ऋतू प्रारंभ
दक्षिणायन–उत्तरायण

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **रवि** | कार्तिक कृ.३० अनुराधा<br>**१**<br>जागतिक एड्स निर्मूलन दिन<br>अमावास्या सकाळी ११.५१ पर्यंत, श्री सिध्दनाथ यात्रा पानीव ता.माळशिरस<br>जमादिलावल मु.२८ | मार्गशीर्ष शु.७ शततारका<br>**८** <br>संत रोहिदास पुण्यतिथी<br>भानुसप्तमी, दत्त नवरात्रारंभ भालचंद्र महाराज पुण्यतिथी कणकवली, शिवप्रताप दिन प्रतापगड उत्सव मु.६ | मार्गशीर्ष शु.१५ मृग<br>**१५**<br>पौर्णिमा दुपारी २.३१ पर्यंत अग्रहायणी,दत्त नवरात्र समाप्ती योगेश्वरी यात्रा अंबाजोगाई बाळोबा यात्रा राहू ता.दौंड रेणुका यात्रा सौंदत्ती मु.१३ | मार्गशीर्ष कृ.७ उत्तरा फाल्गुनी<br>**२२**<br>भानुसप्तमी, कालाष्टमी अयन करिदिन, यल्लमादेवी यात्रा गव्हाण ता.तासगाव शितळादेवी यात्रा उर्से ता.मावळ भारतीय पौष मासारंभ मु.२० | मार्गशीर्ष कृ.१४ ज्येष्ठा<br>**२९**<br>Mahalaxmi.com.co<br>शिवरात्री<br>अमावास्या उ.रात्री ४.०१ नं. सेवागिरी महाराज रथोत्सव पुसेगाव जि.सातारा मु.२७ |
| **सोम** | मार्गशीर्ष शु.१ ज्येष्ठा<br>**२**<br>देवदीपावली<br>मार्तंडभैरव षड्रात्रोत्सवारंभ भैरवनाथ यात्रा बाभूळसर खुर्द ता.शिरूर, भानोबादेव यात्रा कोयाळी ता.खेड<br>चंद्रदर्शन जमादिलावल मु.२९ | मार्गशीर्ष शु.८/९ पूर्वा भाद्रपदा<br>**९**<br>दुर्गाष्टमी<br>श्री महाराणी ताराराणीसो पु.ति.करवीर, भीम जयंती<br>श्री महालक्ष्मी यात्रा बुध ता. खटाव, श्री खंडोबा लंगर यात्रा वाटंबरे ता.सांगोला मु.७ | मार्गशीर्ष कृ.१ आर्द्रा<br>**१६**<br>विजय दिन<br>धनुर्मासारंभ<br>यल्लमादेवी यात्रा कमलापूर ता.सांगोला, श्री भानोबा यात्रा कुसेगाव ता.दौंड मु.१४ | मार्गशीर्ष कृ.८ उत्तरा फाल्गुनी<br>**२३**<br>किसान दिन<br>रामवरदायिनी व नवलाईदेवी यात्रा खावली ता.जि.सातारा भैरवनाथदेव जयंती अपशिंगे (मि.) ता.खटाव मु.२१ | मार्गशीर्ष कृ.३० मूळ<br>**३०**<br>दर्श वेळा सोमवती<br>अमावास्या उ.रात्री ३.५६ प. ताम्हणकर महा.पु.ति.सांगली श्री तुकारामबाबा जोशी पु.ति. काळबादेवी यात्रा मुंबई मु.२८ |
| **मंगळ** | मार्गशीर्ष शु.२ मूळ<br>**३**<br>जागतिक दिव्यांग दिन<br>महाराजा यशवंतराव होळकर जयंती, गुरुभंडारा धारेश्वर ता.पाटण जमादिलाखर मु.१ | मार्गशीर्ष शु.१० उ.भाद्रपदा<br>**१०**<br>श्री महालक्ष्मी महापूजा कोकीसरे ता.वैभववाडी कृष्णा नदी उत्सव सांगली केतेश्वर महाराज जयंती बुरुड समाज सांगली मु.८ | मार्गशीर्ष कृ.२ पुनर्वसु<br>**१७**<br>Mahalaxmi.com.co<br>पेन्शनर्स डे<br>श्री नागोबा यात्रा पालखी म्हसवड ता.माण जि.सातारा बोअरिंग मारणेस शुभ मु.१५ | मार्गशीर्ष कृ.९ हस्त<br>**२४**<br>राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन<br>सोमजादेवी रथयात्रा श्रीवर्धन सेवागिरी महा.पु.ति.उत्सव पुसेगाव जि.सातारा मु.२२ | पौष शु.१ पूर्वाषाढा<br>**३१**<br>सूर्यनारायण मंदिर किरणोत्सव प्रा.नारायण चिंचोली ता.पंढरपूर रंगदासस्वामी म.पु.ति.क्षेत्र अणे ता.जुन्नर जमादिलाखर मु.२९ |
| **बुध** | मार्गशीर्ष शु.३ पूर्वाषाढा<br>**४**<br>भारतीय नौदल दिन<br>विनायक चतुर्थी (खुलासा पहा) वीर विघ्नेश जन्मोत्सव रत्नागिरी, भोजलिंगदेव यात्रा जांभुळणी ता.माण मु.२ | मार्गशीर्ष शु.११ रेवती<br>**११**<br>मोक्षदा एकादशी<br>गीता जयंती, खंडोबा यात्रा मलवडी ता.दहीवडी माणिकप्रभू उत्सव हुमणाबाद *मौनी एकादशी(जैन)* मु.९ | मार्गशीर्ष कृ.३ पुष्य<br>**१८** <br>संकष्ट चतुर्थी<br>चंद्रोदय रात्री ८.५८<br>यल्लमादेवी यात्रा कवलापूर ता.मिरज जि.सांगली मु.१६ | मार्गशीर्ष कृ.१० चित्रा<br>**२५** <br>ख्रिसमस, नाताळ<br>भगवान पार्श्वनाथ जयंती (जन्मकल्याणक),रंगनाथस्वामी पुण्यतिथी निगडी ता.कोरेगाव गोंदवलेकर महा.पु.ति. मु.२३ | |
| **गुरु** | मार्गशीर्ष शु.४ उत्तराषाढा<br>**५**<br>Mahalaxmi.com.co<br>विनायक चतुर्थी (खुलासा पहा) सिध्दनाथ यात्रा मारुल–हवेली ता.पाटण, दाराची चौकट बसविणेस शुभ दिवस मु.३ | मार्गशीर्ष शु.१२ अश्विनी<br>**१२**<br>स्वदेशी दिन<br>हुतात्मा बाबू गेनू स्मृतिदिन<br>पंचक सकाळी ११.४७ पर्यंत मु.१० | मार्गशीर्ष कृ.४ आश्लेषा<br>**१९**<br>गोवा मुक्तिदिन<br>श्री श्रध्दानंदस्वामी पुण्यतिथी रेणुका यात्रा सावर्डे ता.तासगाव मदन महा.बिहाणी पु.ति.कडा ता.आष्टी जि.बीड मु.१७ | मार्गशीर्ष कृ.११ स्वाती<br>**२६**<br>सफला एकादशी<br>बॅ.बाळासाहेब खर्डेकर पुण्यदिन श्री यल्लमा यात्रा खंडेराजुरी ता.मिरज, श्री मुकुंदराजस्वामी यात्रा अंबाजोगाई मु.२४ | |
| **शुक्र** | मार्गशीर्ष शु.५ श्रवण<br>**६** <br>नागपूजन,नागदिवे<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन<br>क्रांति.नाना पाटील पुण्यदिन पंचक उ.रा.५.०६ नंतर मु.४ | मार्गशीर्ष शु.१३ भरणी/कृत्तिका<br>**१३**<br>प्रदोष<br>रेणुका यात्रा यड्राव ता.शिरोळ जनार्दनस्वामी(मौनगिरीजी) पु.ति.बेटकोपरगाव जि.नगर हुतात्मा दिन गारगोटी पारशी अमर्दाद मासारंभ मु.११ | मार्गशीर्ष कृ.५ मघा<br>**२०** <br>संत गाडगेबाबा पुण्यदिन<br>योगी राजेंद्र गुरू होटगी पुण्यदिन ता.द.सोलापूर मु.१८ | मार्गशीर्ष कृ.१२ विशाखा<br>**२७**<br>स्वामी स्वरुपानंद जयंती पावस यल्लमा यात्रा जत जि.सांगली व घानवड ता.खानापूर जि.सांगली रेणुका यात्रा म्हसवड ता.माण सोपानकाका पु.ति.सासवड मु.२५ | |
| **शनि** | मार्गशीर्ष शु.६ धनिष्ठा<br>**७**<br>ध्वज दिन, चंपाषष्ठी<br>स्कंद षष्ठी, मार्तंड भैरवोत्थापन खंडोबा उत्सव–देलवडी व किरीवाडी ता.दौंड,शिंगवे ता. आंबेगाव जि.पुणे मु.५ | मार्गशीर्ष शु.१४ रोहिणी २ रा शनि.<br>**१४** <br>श्री दत्तात्रेय जयंती<br>पौर्णिमा सायं.४.५९ नंतर कुलधर्म,श्रीधरस्वामी जयंती गाणगापूर क्षेत्रे श्री दत्त जयंती भैरवनाथ यात्रा चचेगाव ता.कराड | मार्गशीर्ष कृ.६ पूर्वा फाल्गुनी<br>**२१**<br>उत्तरायणारंभ<br>मोरया गोसावी संजीवन समाधी चिंचवड पुणे, बहादूरशहादेव यात्रा मनू ता.कराड मकरायन दुपारी २.५० मु.१९ | मार्गशीर्ष कृ.१३ अनुराधा ४ था शनि.<br>**२८**<br>शनिप्रदोष<br>पूर्वाषाढार्कः उ.रात्री १२.२४ संताजी जगनाडे महा.पु.ति. सदुंबरे ता.मावळ जि.पुणे यल्लमादेवी यात्रा कलेढोण ता.खटाव जि.सातारा मु.२६ | |

### गोव्यातील उत्सव

दि.१ श्री वनदेवी–मुळगाव व हडकोन,बानस्तारी जत्रा, पार्से जत्रा ता.पेडणे
दि.२ श्री कपिलेश्वरी जत्रा, श्री रवळनाथ जत्रा सांखळी
दि.४ मदनंत जत्रा सावईवेरे
दि.६ श्री सातेरी कालोत्सव म्हापसा, तुये जत्रा
दि.१० विजयादुर्गा जत्रा केरी
दि.१३ नवदुर्गा जत्रा कुंडई
दि.१४ सांखळी जत्रा, गणपती पंचायतन आल्तू रुमडावाडा वास्को जत्रा
दि.१५ शिवनाथ शिरोडे जत्रा
दि.१७ श्री महालक्ष्मी देवस्थान काला उत्सव पणजी,
दि.२० सातेरी जत्रा आगरवाडा
दि.२२ श्री महालक्ष्मी मंदिर जीर्णोद्धार दिन उत्सव पणजी
दि.३० श्री गजांतलक्ष्मी रवळनाथ जत्रा मार्शेल फोंडा

### विनायक चतुर्थी खुलासा

बुधवार दि.४ डिसेंबर रोजी विनायक चतुर्थी असणारी गावे– मुंबईसह संपूर्ण कोंकण, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा, विदर्भ (नागपूर व चंद्रपूर सोडून) आणि संपूर्ण कर्नाटक या ठिकाणी दि.४ डिसेंबर रोजी विनायक चतुर्थी आहे.

गुरुवार दि.५ डिसेंबर रोजी विनायक चतुर्थी असणारी गावे– महाराष्ट्रातील नागपूर आणि चंद्रपूर, आंध्र प्रदेश मधील विजयवाडा, काकिनाडा, मध्य प्रदेश मधील झाँसी, ग्वाल्हेर, छिंदवाडा, जबलपूर, सागर, या ठिकाणी दि.५ डिसेंबर रोजी विनायक चतुर्थी आहे.

### तिथीविषयक माहिती

दि.२ ज्येष्ठार्कः रात्री ७.०८
राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन
रघुनाथ महा.यात्रा नांदगाव ता.कराड
धारेश्वर काटेपालखी यात्रा जि.सातारा
रामरथ यात्रा फलटण जि.सातारा
मळाईदेवी यात्रा कुसरुंड ता.पाटण
भिंताडे महा.पुण्यतिथी भिवरी ता.पुरंदर
अण्णामहाराज पवार पुण्यतिथी सोलापूर
दि.२ देवदीपावली उत्सव खालील ठिकाणी
श्री सिध्दनाथ यात्रा खुबी ता.कराड
श्री वीरभद्र जयंती नाझरे ता.सांगोला
भैरवनाथ यात्रा प्रारंभ मोरगिरी ता.पाटण
सिध्दनाथ यात्रा म्हसवड ता.माण
यशवंतराय यात्रा भाऱ्हाटी ता.बारामती
भैरीदेव जत्रा घोणसरे(उमरोली) ता.चिपळूण
श्री शावरसिध्द व सिलिसिध्द देव यात्रा आचेगाव ता.द.सोलापूर
दि.७ यल्लमा यात्रा खटाव ता.मिरज
दि.७ खंडोबा उत्सव खालील ठिकाणी
रेवडी ता.कोरेगाव, बेहरे चिंचोली व य.मंगेवाडी ता.सांगोला, निमगाव(म.) ता.माळशिरस, देवधानोरा ता.कळंब
दि.८ *अष्टान्हिक व्रतारंभ(जैन)*
संताजी जगनाडे म.जयंती सदुंबरे ता.मावळ
खंडोबा यात्रा साखळी कडलास ता.सांगोला
खंडोबा यात्रा अजनाळे ता.सांगोला
दि.११ कादरशाबाबा उर्स दहीवडी ता.माण
रत्नेश्वर वार्षिकोत्सव धामणसे जि.रत्नागिरी
मल्हारी म्हाळसाकांत यात्रा ता.दहीवडी
दि.१४ राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन
अमृत सकाळी ७.०५ नंतर
कानिफनाथ मूर्ती वर्धापन दिन गिलबिलेनगर पिंपरी–चिंचवड मोशी ता.हवेली जि.पुणे
दि.१४ दत्त जयंती उत्सव खालील ठिकाणी
नृसिंहवाडी ता.शिरोळ,शेणगाव ता.भुदरगड दत्त मंदिर बाजीरे ता.पोलादपूर जि.रायगड, रेठरे खुर्द ता.कराड, बेवनूर ता.जत, जगताप मळा कामेरी ता.वाळवा, आडतमळा वेळापूर ता.माळशिरस, दत्तधाम टोकवाडी ता.परळी वैजनाथ, शिंगवे केशव दत्ताचे ता.पाथर्डी जि.नगर
दि.१५ मूले धनुष्यार्कः रात्री १०.१०
पुण्यकाल दुपारी १२.३४ ते सायं.६.०२
*अष्टान्हिक व्रत समाप्त(जैन)*
यल्लमादेवी यात्रा मानेगाव ता.सांगोला
ज्योतिर्लिंग भंडारा गारवडे ता.पाटण
यल्लमा यात्रा ढोकबाभुळगाव जि.सोलापूर
श्री बाबा महाराज आर्वीकर पुण्यतिथी माचणूर ता.मंगळवेढा
श्री यल्लमा यात्रा आरवडे ता.तासगाव
श्री सिध्देश्वर यात्रा सलगरे ता.मिरज
श्री यल्लमादेवी यात्रा बेवनूर ता.जत
सिध्देश्वर देवस्थान यात्रा मांडवगण ता.श्रीगोंदा
दि.२१ *सौर शिशिर ऋतू प्रारंभ*
अयन पुण्यकाल दु.२.५० ते सायं.६.०५
दि.२५ संत काशीबा महाराज पुण्यतिथी क्षेत्र अरण ता.माढा
श्री राधाकृष्ण उत्सव रोहिंजन ता.पनवेल
दि.२८ गुळवणी महाराज जयंती सांगली
यल्लमा यात्रा कोकळे ता.कवठेमहांकाळ
दि.३१ अंबिका यात्रा नाईचाकुर ता.उमरगा

या महिन्यात उपनयन मुहूर्त नाहीत.

शुभ दिवस– दि.३ शुभ दिवस, दि.४ मध्यम, दि.५ दु.१२.४९ नंतर शुभ,दि.६ दि.७ शुभ, दि.८ मध्यम, दि.११ दुपारी २.२८ प.शुभ, दि.१२ मध्यम दिवस, दि.१४ सायं.४.५९ पर्यंत शुभ, दि.१५ शुभ,दि.१७ शुभ दिवस, दि.१८ स.१०.०६ ते रा.७.३३ प.शुभ दिवस, दि.२३ व दि.२४ शुभ,दि.२५ मध्यम दिवस, दि.२६ सायं.६.०८ पर्यंत शुभ दिवस

त्याज्य दिवस– दि.१,२,९,१०,१३, दि.१६,१९,२१,२२,२७,२८,२९,३०

वास्तू मुहूर्त– दि.७,११,१२,२३,२५,२६
भूमिपूजन मुहूर्त– दि.४,५,६,११,१२, दि.२०,२३ जावळ मुहूर्त– दि.६,८, दि.११,१२,१५,१८,२३,२५,२६



साखरपुडा मुहूर्त– दि.३,४,५,६,७, दि.११,१२,१४,१५,२३,२४,२५,२६
विवाह मुहूर्त– दि.३,४,५,६,७,११, दि.१२,१४,१५,२०,२३,२४,२६

# सन २०२४ चे सप्तरंगी चित्रमय पंचांग

### जानेवारी २०२४

दि.१२ राजमाता जिजाऊ जयंती

दि.१२ स्वामी विवेकानंद जयंती

दि.१५ मकर संक्रांती



दि.२३ नेताजी जयंती



दि.२६ प्रजासत्ताक दिन

### फेब्रुवारी २०२४

दि.१३ श्री गणेश जयंती

दि.१६ रथसप्तमी




दि.१९ छ.शिवाजी महाराज जयंती

दि.२३ संत गाडगेबाबा जयंती (तारखेनुसार)

दि.२४ संत रोहिदास जयंती

### मार्च २०२४

दि.३ गजानन महा.प्रकट दिन शेगांव



दि.८ महाशिवरात्री

दि.२५ धूलिवंदन

दि.२८ शिवजयंती (तिथीनुसार)

दि.२९ गुडफ्रायडे



दि.३० रंगपंचमी


दि.३१ ईस्टर संडे

### एप्रिल २०२४

दि.९ गुढीपाडवा



दि.१० स्वामी समर्थ प्रकट दिन



दि.११ रमजान ईद

दि.१४ डॉ.आंबेडकर जयंती

दि.१७ श्रीरामनवमी

दि.२१ श्री महावीर जयंती

दि.२३ हनुमान जयंती

दि.३० राष्ट्रसंत तुकडोजी महा.जयंती

### मे २०२४



दि.१ महाराष्ट्र दिन कामगार दिन

दि.६ राजर्षी छ.शाहू महा.पुण्यदिन

दि.१० अक्षय्यतृतीया

दि.१० म.बसवेश्वर जयंती

दि.१४ छ.संभाजीराजे जयंती



दि.२३ बुध्द पौर्णिमा

### जून २०२४



दि.६ किल्ले रायगड येथे शिवराज्याभिषेक सोहळा

दि.६ श्री शनैश्चर जयंती

दि.१७ राजमाता जिजाऊ स्मृतिदिन

दि.१७ बकरी ईद

दि.२१ वटपौर्णिमा



दि.२६ राजर्षी छ.शाहू महाराज जयंती

### जुलै २०२४

दि.८ मोहरम,ताबूत बसविणे

दि.१३ वीर शिवा काशीद पुण्यदिन

दि.१७ देवशयनी आषाढी एकादशी

दि.१७ मोहरम,ताबूत विसर्जन

दि.१९ महाराष्ट्रीय बेंदूर



दि.२१ गुरुपौर्णिमा उत्सव

### ऑगस्ट २०२४



दि.९ नागपंचमी

दि.११ भगवान पार्श्वनाथ निर्वाण दिन



दि.१५ स्वातंत्र्य दिन

दि.१५ फरवर्दिन

दि.१९ रक्षाबंधन,नारळीपौर्णिमा

### सप्टेंबर २०२४

दि.५ शिक्षक दिन



दि.७ श्री गणेश चतुर्थी

दि.१२ गौरी गणपती विसर्जन

दि.१५ अभियंता दिन

दि.१६ ईद–ए–मिलाद

दि.१७ अनंत चतुर्दशी

### ऑक्टोबर २०२४

दि.२ महात्मा गांधी जयंती



दि.३ घटस्थापना, शारदीय नवरात्रारंभ

दि.१२ खंडेमहानवमी

दि.१२ विजयादशमी,दसरा

दि.१२ श्री साईबाबा पु.ति.शिर्डी

दि.१६ कोजागरी पौर्णिमा

दि.२९ धनत्रयोदशी

दि.३१ नरक चतुर्दशी

### नोव्हेंबर २०२४

दि.१ दीपावली श्री लक्ष्मी–कुबेर पूजन



दि.२ बलिप्रतिपदा दीपावली पाडवा

दि.३ भाऊबीज



दि.१२ प्रबोधिनी एकादशी

दि.१३ तुलसी विवाहारंभ

दि.१५ गुरुनानक जयंती

### डिसेंबर २०२४

दि.२ देवदीपावली

दि.८ संत रोहिदास पुण्यतिथी



दि.१४ श्री दत्तात्रेय जयंती



दि.२० संत गाडगेबाबा पुण्यदिन



दि.२५ ख्रिसमस,नाताळ


शास्त्रशुध्द संपूर्ण वार्षिक पंचांग

**श्री महालक्ष्मी**

॥ श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ॥

फेसबुक पेजला लाईक व फॉलो करणेसाठी क्यू.आर. कोड स्कॅन करा किंवा खालील लिंकवर क्लिक करा.

https://www.facebook.com/shrimahalaxmipanchang


नमस्कार,

**'श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे, साक्षात लक्ष्मी वसे तिथे'** ही आमची टॅगलाईन वर्षानुवर्षे मनावर जशी अधिराज्य गाजवत आली आहे, तसाच काहीसा पारंपरिक गोष्टींचा पगडा आजच्या या जागतिकीकरणाच्या युगात देखील आपल्या मनावर आहे. त्यातील एक गोष्ट म्हणजे **'श्री महालक्ष्मी वार्षिक पंचांग दिनदर्शिका'** ही होय. संगणकीय युग असून देखील प्रत्येक घरात एक तरी दिनदर्शिका ही असतेच. आणि म्हणूनच आपण गेली अनेक वर्षे ही दिनदर्शिका छापत आलो आहोत. या दिनदर्शिकेत सर्वसमावेशक अशी शास्त्रोक्त पंचांगाची माहिती आपण देत असतो. दरवर्षी नावीन्यपूर्ण विषय घेवून माहितीपर लेख देताना लहानांपासून वृध्दांपर्यंत सर्वांना उपयुक्त ठरेल, यावरच आमचा भर असतो. तुमचा हा विश्वासच आमच्या अविरत चालू असणाऱ्या परंपरेचा अविभाज्य घटक आहे. कालानुरूप त्यात बदल हे करावेच लागतात आणि म्हणूनच आम्ही नवनवीन प्रयोग करतो आहोत.

आजकालच्या या स्पर्धात्मक धकाधकीच्या जीवनात सामाजिक व्यासपीठ अर्थात जिव्हाळ्याचा विषय म्हणजे सोशल मीडिया होय. आणि म्हणूनच आम्ही फेसबुक व इन्स्टाग्राम या स्त्रोतांद्वारे आपल्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत आहोत. दिनदर्शिकेत जागेअभावी आम्हाला मर्यादा येतात. त्यामुळे तत्काळ व जलद देवाणघेवाणीसाठी संपर्काच्या या माध्यमांचा वापर करणे संयुक्तिक ठरेल.. त्यासाठी आपण आमच्या अधिकृत फेसबुक पेजला लाईक व फॉलो करून संपर्कात राहा, जेणेकरून आपणांस आम्ही तिथे प्रकाशित करीत असलेल्या माहितीचा लाभ घेता येईल. चला तर मग...

**पारंपरिकतेला आधुनिकतेचा लेवू या नवीन साज, नावीन्यपूर्णतेने देवाणघेवाणीचा आनंद लुटू या आज!**


**दैनंदिन राशिभविष्य, पंचांग दिनदर्शिका माहिती, ज्योतिष, आपल्या पत्रिकेनुसार व्यक्ती अनुरूप मुहूर्त वगैरे मार्गदर्शनासाठी आमचे खालील वेबसाईटला भेट द्या.**

www.mahalaxmipanchang.com


# नर्मदा परिक्रमा

**नर्मदा परिक्रमा** – भारत भूमीमध्ये नर्मदेपेक्षाही आकाराने व लांबीने मोठ्या नद्या असल्या तरी नर्मदेचे प्राचीनत्व आणि पुण्यप्रद असे श्रेष्ठत्व अनन्यसाधारण असल्यामुळे परिक्रमा ही केवळ नर्मदेचीच केली जाते. नर्मदा परिक्रमेचे आद्यप्रवर्तक म्हणजे सप्तचिरंजीवांपैकी एक असे श्रीमार्कण्डेय मुनी, ज्यांनी सुमारे सात हजार वर्षांपूर्वी नर्मदेची परिक्रमा केली. त्या वेळी त्यांनी केवळ नर्मदेचेच नव्हे तर तिला मिळणाऱ्या नऊशे नव्व्याणव (९९९) नद्यांचेही पात्र ओलांडले नाही, तर त्यांच्याही उगमस्थानांना वळसा घालून त्यांनी ही महापरिक्रमा सुमारे २७ वर्षांमध्ये पूर्ण केली. सप्तचिरंजीवांपैकी अश्वत्थामा तसेच श्रीमारुतीरायांचाही संचार नर्मदाकिनारी असतो अशी श्रद्धा आहे. आद्य श्रीशंकराचार्यांनी तर गुरूच्या शोधात गंगेकडे प्रस्थान केले होते पण नर्मदा हीच त्यांची तपोभूमी ठरली. संन्यासीधर्मानुसार नर्मदेच्या तटाने अविरत परिभ्रमण करत असतानाच त्यांनी ओंकारेश्वर पर्वतातील जी गुहा तपश्चर्येसाठी निश्चित केली तेथे त्यांचे गुरू आचार्य गोविंद भगवत्पाद यती हे त्यांची प्रतिक्षा करत होते. पुढे ज्या वेळी नर्मदेला पूर आला व गुहेत पाणी येऊ लागले तेव्हा तिला शांत करण्यासाठी श्रीशंकराचार्यांनी नर्मदाष्टकाची रचना केली. अमरकंटक हे तर माता पार्वतीचे आवडते स्थान असून भगवान शंकर आपल्या परिवारासह येथे वास्तव्य करतात अशी श्रद्धा आहे. म्हणूनच जेव्हा आपण नर्मदेची परिक्रमा करतो तेव्हा तिच्यासह शिवपार्वतीची परिक्रमाही संपन्न होते. अशी ही पतितपावनी नर्मदामैय्या सर्वथैव कल्याणकारी व मोक्षदायिनी असल्यामुळे नर्मदा नदीची साक्षात देवीच्या स्वरूपात **पूजा** (कन्यापूजन), **आराधना** (आरती व नर्मदाष्टक पठण) व परिक्रमेच्या माध्यमातून **उपासना** केली जाते.

**रुद्र परिक्रमा, जलहारी परिक्रमा** आणि **हनुमान परिक्रमा** अशी तीन प्रकारे नर्मदेची परिक्रमा केली जात असली तरी बहुतांशी लोक रुद्रपरिक्रमाच करतात. कार्तिक शुक्ल द्वादशीपासून आषाढ शुक्ल दशमी ह्या दरम्यान परिक्रमा केली जाते. आषाढ शुक्ल एकादशी (आषाढी एकादशी) पासून कार्तिक शुक्ल एकादशीपर्यंत चातुर्मासात परिक्रमा करता येत नाही. जो साधक श्रध्देने व निष्ठेने परिक्रमा करतो त्याला त्याच्या योग्यतेनुसार प्रचिती येत असते. विशेषकरून परिक्रमेत मैय्या आपली मुलाप्रमाणे पालन करते, काळजी घेते अशा प्रकारचा अनुभव बहुतेक साधकांना येतो. परिक्रमेत कधी कधी आपत्प्रसंग येतात, कधी मार्ग चुकतो अशा वेळी **'नर्मदे ऽऽ हर'** असा जप करताच कोणत्या ना कोणत्या रूपाने ती धावून येते अशी धारणा आहे.

नर्मदा परिक्रमा म्हणजे लौकिक तथा पारलौकिक जीवन जगण्याची कला शिकवणारे पारमार्थिक विद्यापीठच म्हणता येईल. ज्याप्रमाणे गंगेच्या सान्निध्यात गेल्यानंतर मनामधील पापपुण्यांच्या संकल्पना मुळापांसून नष्ट होणे अपेक्षित आहे तसे नर्मदेच्या कुशीमध्ये आसक्तीविरहित होणे अपेक्षित आहे. जसे की, कितीही कंगोरे असलेला दगड नर्मदेच्या प्रवाहात वाहत वाहत गुळगुळीत असा नर्मदेश्वर बनून पूजला जातो तसे परिक्रमा केल्यानंतर साधकाचे मोह, माया, लोभ हे कंगोरे बोथट होणे अपेक्षित आहे.

परिक्रमेबाबत वस्तुनिष्ठ माहिती सहजपणे उपलब्ध होत नसल्यामुळे परिक्रमा खडतर आहे असा एक समज आहे. त्यामुळे परिक्रमेची इच्छा असणाऱ्या सर्वसामान्य लोकांना संदेह होतो – 'परिक्रमा करावी का न करावी.?' तथापि, परिक्रमेचा मूळ हेतू लक्षात घेऊन नर्मदामैय्याचे माहात्म्य उमजले तर ह्या प्रश्नाची उकल सोपी होते. अगदी काटेकोर कागदावर रेखाटलेली परिक्रमा करण्याचा अट्टाहास करण्यापेक्षा एक ढोबळ आराखडा करून पुढील मार्गक्रमण नर्मदामैय्याच्या इच्छेनुसार होऊ द्यावे. परिक्रमेचा प्रारंभ अमरकंटक, नेमावर व ओंकारेश्वर ह्यांपैकी कुठूनही करता येतो. पण बहुतेक जण ओंकारेश्वरहून परिक्रमा सुरू करतात कारण ओंकारेश्वरला सांगता करणे सोपे ठरते. प्रथम क्षौर व स्नानादी करून संकल्पोक्त नर्मदापूजन व कन्यापूजन केले जाते. नंतर परिक्रमा आरंभ करण्यापूर्वी आवश्यक ते प्रमाणपत्र घेतले जाते. (जोड गणपती मंदिरामधील महंत परिक्रमेसाठी प्रमाणपत्र देतात, त्यासाठी दोन फोटो व आधारकार्ड झेरॉक्स असणे आवश्यक आहे.) गाडीने परिक्रमा करणार असाल तर साधारणतः दीडशे ते दोनशे किलोमीटरचे टप्पे घेणे योग्य ठरते.

परिक्रमा करताना क्रमशः बाजीराव पेशव्यांची समाधी रावेरखेडी करून पुढे तेली भट्टयाण येथील ११० वर्षांचे सियारामबाबा यांचा आशीर्वाद घ्यावा. गाडीने परिक्रमा करत असाल तर पहिल्या दिवशी तेली भट्टयाणला मुक्काम करता येईल. नंतर साधारण २० किलोमीटरवर एखादा आश्रम असतोच. शालिवाहन, प्रकाशा करून शुलपाणेश्वराचे दर्शन घ्यावे. पुढे कुंभेश्वर व पोइचा येथे स्वामी नारायण मंदिर आहे. भालोद येथे अवश्य मुक्काम करता येईल. विमलेश्वरला पोहोचण्यापूर्वी हनुमान टेकरी येईल. येथील अन्नक्षेत्रामध्ये अवश्य प्रसाद घ्यावा. कारण विमलेश्वरला समुद्र पार करताना भरती–ओहोटीच्या वेळापत्रकानुसार किती वेळ लागेल हे सांगता येत नाही. नंतर नावेतून उत्तर तटावर गेल्यानंतर भडभूत, नारेश्वर, चांदोद, तिलकवाडा ही ठिकाणे आहेत. तिलकवाडा येथे रामदासस्वामी स्थापित हनुमंत आहे. तसेच वासुदेव कुटीर आश्रम आहे. तेथे टेंबेस्वामींची मूर्ती आहे. येथे मुक्काम करता येईल. पुढे गरुडेश्वर लागते जेथे टेंबेस्वामींची समाधी आहे. नंतर कुबेर भंडारी, डोंगरे महाराजांचा मठ, मांडवगडचा किल्ला आहे. नंतर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांची राजधानी असलेले महेश्वर लागते. येथील नर्मदाघाट अप्रतिम आहे. सप्तमातृका मंदिर आहे. पुढे नेमावरला चिन्मय धाम येथे मुक्काम करता येईल. नंतर बुधनी, राजपुरा व नंतर अनघोरा हे गाव लागते. तेथून ब्रह्मांड घाट (बर्मान घाट) पुढे जबलपूर. या सर्व ठिकाणी मुक्कामाची व भोजनाची सोय आहे. पुढे जोगी टिकरिया लागते. इथे नर्मदामाईचे पात्र उल्लंघन होऊ शकते त्यामुळे सावध असावे. अगदी किनाऱ्यालगतच शाळा आहे जेथे मुक्कामाची सोय आहे. पुढे नर्मदामैय्याचे उद्गमस्थान, अमरकंटक लागते. इथे प्रथम उत्तर तटावरील सर्व स्थानांचे दर्शन घेऊनच पलीकडे माईच्या बगियात जावे. कारण एकदा का तुम्ही दक्षिण तटावर गेलात की पुन्हा उत्तर तटावर येता येत नाही. जवळच शोन (सोनभद्र) नदीचे उगम स्थान आहे. अमरकंटक येथे मृत्युंजय आश्रमात मुक्कामाची सोय होऊ शकते. दक्षिण तटावर परिक्रमा करताना आश्रम दूर अंतरावर आहेत. कारोपानी जंगलात चरकुटिया आश्रम असून येथे अन्नक्षेत्र आहे. पुढे डिंडौरी, मंडला येथेही आश्रम आहेत. नरसिंहपूर नंतर एका ढाब्यावर भोजनाची व्यवस्था होऊ शकते. पुढे पिपरिया नर्मदापूर (होशंगाबाद)च्या पुढे गेल्यानंतर कोकसरला गौरी–शंकर महाराजांची समाधी आहे. हरदा या गावाजवळ लछोरा येथे आश्रम आहे. पुढे सिंगाजी महाराज करून ओंकारेश्वर येथे आल्यानंतर परिक्रमा संपन्न होईल.

**परिक्रमेतील आचारसंहिता** – परिक्रमा आरंभ करण्यापूर्वी संकल्प करावा. नर्मदापूजन करून 'माईची कढाई' अर्थात शिरा–हलवा असा प्रसाद दाखवून कन्या, साधू–सत्पुरुषांना तसेच अतिथींना द्यावा. शक्य असेल तर यथाशक्ती भोजन प्रदान करावे. दररोज नर्मदास्नान करावे. नंतर संध्यावंदन व नित्यपाठ करून नर्मदेचे पूजन करावे. पूजेमध्ये प्रतिकात्मकरित्या सोबत आधारासाठी घेतलेली काठी व नर्मदाजलाची कुपी ठेवतात. परिक्रमेत चालताना सदैव 'नर्मदे हर' चा जप किंवा इष्टदेवतेचे नामस्मरण करावे. प्रदक्षिणा कालावधीत दान घेऊ नये. तथापि, श्रध्देने कोणी भोजन देऊ इच्छित असेल तर अवश्य स्वीकार करावा. आदरातिथ्याचा स्वीकार करणे हा तीर्थयात्रीचा आद्यधर्म असतो. सदावर्तात शिधा दिला जातो. तो घेऊन आपण अन्न शिजवू शकतो. व्यर्थ वादविवाद, परनिंदा, चहाडी करू नये. वाणीवर संयम असावा. सदैव सत्यवचनी असावे. कायिक (शरीराद्वारे केले जाणारे) व मानसिक (मनाद्वारे केले जाणारे) तपाचा अंगीकार करावा. शौच, मार्जन, देव–द्विज–गुरु यांचे पूजन तसेच ब्रह्मचर्य व अहिंसा पालन यांचा अंतर्भाव कायिक तपामध्ये होतो; मौन, परानिष्टचिंतन न करणे, परद्वेष न करणे यांचा समावेश मानसिक तपामध्ये होतो. नर्मदेचे पात्र ओलांडू नये. तथापि, नर्मदेला मिळणारी एखादी नदी जर मध्ये येत असेल तर ती एकदाच ओलांडावी. चातुर्मासात परिक्रमा करू नये. केस कापू नयेत तसेच अगदी आवश्यक असेल तरच नखे कापावीत. नर्मदास्नान करताना साबणाचा प्रयोग टाळावा. परिक्रमा संपन्न झाल्यानंतर मुंडणादी कर्म करून विधिवत स्नान करावे. भगवान शंकराची अभिषेकपूर्वक पूजा करावी. तसेच पुनःश्च उत्साहपूर्वक व आपल्या सामर्थ्यानुसार नर्मदामैय्याची कढाई व कन्यापूजन करावे. कन्या, ब्राह्मण, साधू व अतिथी यांना यथाशक्ती भोजन देऊन त्यांचा आशीर्वाद घ्यावा व संकल्पपूर्ती करावी.

**उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा** – नर्मदा पश्चिमेकडे वाहत असताना 'रामपुरा ते तिलकवाडा (गुजरात)' ह्या दरम्यान ती उत्तरवाहिनी होते नंतर पुनःश्च ती पश्चिमेकडे वाहू लागते. जो कोणी चैत्र महिन्यात उत्तरवाहिनी नर्मदेची परिक्रमा करतो, त्यास संपूर्ण नर्मदा परिक्रमा केल्याचे पुण्य मिळते असा उल्लेख पुराणग्रंथांमध्ये आलेला आहे. त्यामुळे ज्यांना संपूर्ण परिक्रमा सर्वथैव अशक्य आहे असे भाविक उत्तरवाहिनी–नर्मदाप्रदक्षिणा करतात.

**उपसंहार** – नद्यांना 'लोकमाता' ही संज्ञा आहे. नदीचे नाव कोणतेही असले तरी ग्रामवासी तिला गंगाच म्हणतात. पूर्वीच्या काळी जेव्हा पायी यात्रा केली जाई तेव्हा आयुष्यात एकदा तरी गंगास्नान घडावे अशी मनीषा असे. पूर्वायुष्यात किंवा उत्तर आयुष्यात गंगास्नान करून आलेली व्यक्ती आपल्या नजीकच्या नदीलाच गंगा मानून भजत असे. त्यामुळे एखाद्याचे नदीवर प्रेम आहे, श्रद्धा आहे कशावरून लक्षात घ्यायचे. तर गंगा तसेच नर्मदा यांना तो 'मैय्या' म्हणून पुकारतोच पण त्याच्या गावातील नदी पाहताच मी 'हर हर गंगे' किंवा 'नर्मदे हर' चा जयघोष करतो. किंबहुना कोणत्याही वाहणाऱ्या जलप्रवाहामध्ये त्याला गंगा–यमुना–नर्मदा दिसतात. त्याच्या गावातील नदी तो स्वच्छ ठेवतो. पर्वकाळी तिच्या काठी स्नान करतो, आरती करतो. तिचा जलप्रवाह निर्मल ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. निदान स्वतःकडून तरी कोणताही वाहता जलप्रवाह दूषित होणार नाही याची काळजी घेतो. कारण कोणताही जलप्रवाह नदीच्या ओढीने वाहत जात असतो आणि नदी सागराच्या ओढीने वाहत जात असते. म्हणूनच सागरास 'सरित्पती' अर्थात 'सरितांचा पती' अशी संज्ञा आहे. तात्पर्य, नर्मदा परिक्रमेच्या निमित्ताने आपल्या लोकमातांचे अर्थात नद्यांचे माहात्म्य लक्षात घेऊन किमान आपल्याकडून तरी नदी प्रदूषित होणार नाही असा संकल्प प्रत्येकाने केला तरी एका अर्थाने परिक्रमेचा हेतू सार्थ झाला असे म्हणता येईल.

त्वदीय पाद पंकजम नमामि देवी नर्मदे ॥

॥ नर्मदे हर ॥


– वेदवाणी प्रकाशन, कोल्हापूर

मोबाईल नंबर : ८००७०२१०६०

www.vedwani.com